
SAMPLE CONTENT

CCE Pattern Perfect Notes

# भूगोल

प्रभावी संकल्पनांची उभारणी



इयत्ता सातवी


(मराठी माध्यम)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित.

# इयत्ता सातवी

# भूगोल




SAMPLE CONTENT

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 59817

**10820_11690_JUP**

# प्रस्तावना

***चला भूगोल शिकूया, निसर्गाकडे अधिक सजगतेने पाहूया!***

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,

यावर्षी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने ज्ञानरचनाधारित अधिक कल्पक आणि सुस्पष्ट असा अभ्यासक्रम तयार केला आहे. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, वाचन, लेखन आदी कौशल्ये विकसित व्हावीत असा स्तुत्य प्रयत्न शिक्षण मंडळाने केला आहे. मंडळाचा हा उद्देश ध्यानात घेऊन या नवीन अभ्यासक्रमावर आधारित **टार्गेट प्रकाशनाचे इयत्ता सातवी भूगोल** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला खूप आनंद होत आहे.

CCE पॅटर्ननुसार प्रत्येक पाठाचे संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन असे विभाजन केले आहे. संकलित मूल्यमापन या विभागात प्रत्येक पाठाचा मुद्देसूद परिचय दिला आहे. पाठाचे परिपूर्ण आकलन व्हावे यासाठी वैविध्यपूर्ण प्रश्नांची मांडणी केली आहे. तसेच पाठाधारित प्रश्न व सरावासाठी अधिक प्रश्न दिले आहेत. प्रश्नांची कृतीच्या स्वरूपात मांडणी केली आहे.

आकारिक मूल्यमापन या विभागात 'जरा डोके चालवा', 'जरा विचार करा', 'पहा बरे जमते का?' या पाठातील शीर्षकांखालील सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. आवश्यक तेथे पाठातील 'करून पहा' या शीर्षकाखालील प्रश्नांची उत्तरेही दिली आहेत. त्याचबरोबर या उत्तरांसह कृतीसाठीच्या दिशादर्शक अशा सूचनांचा समावेश करण्यात आला आहे. पाठ्यपुस्तकात दिलेले उपक्रम आवश्यक तेथे परिपूर्ण माहितीसह सोडवून दाखवले आहेत.

पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार प्रश्नांची मांडणी हे टार्गेटच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. प्रश्नांच्या अशाप्रकारच्या मांडणीमुळे प्रश्न सोडवताना पाठातील संकल्पना योग्य क्रमाने पुन्हा एकवार स्पष्ट होतात आणि आकलन सोपे जाते. संकल्पनेचे विविध पैलू वेगवेगळ्या प्रश्नप्रकारांच्या मांडणीतून स्पष्ट केले आहेत. आवश्यक तेथे तक्ते, नकाशे व सुबक आकृत्यांचा कौशल्यपूर्ण वापर केला आहे. प्रत्येक पाठाच्या शेवटी विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यांकनासाठी उपयुक्त अशी 'पाठाची उजळणी' दिली आहे.

या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा भौगोलिक दृष्टिकोन व्यापक होईल, तसेच भूगोल या विषयातील रुची वाढीस लागेल अशी आम्हांला खात्री वाटते.

हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता:
mail@targetpublications.org

ज्ञानार्थींना खूप खूप शुभेच्छा!

प्रकाशक

प्रिय बालमित्रांनो,

तुमचे वैयक्तिक अनुभव आम्हांला कळवा आणि प्रसिद्धीचे मानकरी व्हा. या पुस्तकातील काही प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी स्व-अनुभवाने लिहिणे अपेक्षित आहे. अशा प्रश्नांची उत्तरे तुम्ही तुमच्या शब्दांत लिहून आम्हांला इ-मेल / पत्राद्वारे पाठवा.

त्यांपैकी आदर्श उत्तरे तुमच्या नावासहित आम्ही आमच्या आगामी आवृत्तीत प्रकाशित करू.

पुढील तपशील पाठवा: तुमचे नाव, पाठाचे नाव, प्रश्न आणि उत्तर वर उल्लेख केलेल्या इ-मेल पत्त्यावर किंवा कार्यालयीन पत्त्यावर पाठवा.

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | ऋतुनिर्मिती (भाग-१) | १ |
| २. | सूर्य, चंद्र व पृथ्वी | ५ |
| ३. | भरती-ओहोटी | १६ |
| ४. | हवेचा दाब | २९ |
| ५. | वारे | ३८ |
| ६. | नैसर्गिक प्रदेश | ५० |
| ७. | मृदा | ६२ |
| ८. | ऋतुनिर्मिती (भाग-२) | ७४ |
| ९. | कृषी | ८६ |
| १० | मानवी वस्ती | १०२ |
| ११. | समोच्च रेषा नकाशा आणि भूरूपे | ११३ |


टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शविले आहेत.

SAMPLE CONTENT

# ६. नैसर्गिक प्रदेश

## पाठाचा परिचय

१. पृथ्वीवर वेगवेगळ्या भागांत भूस्वरूपे, हवामान, मृदा यांच्यात आढळणारी विभिन्नता प्रामुख्याने त्या-त्या भागांत उपलब्ध सूर्यप्रकाश व पाणी यांवर अवलंबून असते.
२. सूर्यप्रकाश व पाणी यांची उपलब्धता विषुववृत्तापासून ध्रुवांपर्यंत बदलत जाते.
३. भूस्वरूपे, हवामान, मृदा या तीन घटकांतील बदलांचा प्रभाव वनस्पती, प्राणी व मानवी जीवन यांच्यावर पडतो, त्यामुळे जैवविविधतेत बदल होतो.
४. हवामान, वनस्पती व प्राणिजीवन या घटकांमध्ये पृथ्वीवर वेगवेगळ्या खंडांत विशिष्ट अक्षवृत्तांच्या दरम्यान साधर्म्य आढळते.
५. हवामान, वनस्पती व प्राणिजीवन यांमधील साधर्म्यामुळे पृथ्वीवरील काही प्रदेशांचा वेगळेपणा विशेषत्वाने दिसून येतो. नैसर्गिक घटकांवर अवलंबून असल्यामुळे या प्रदेशांना नैसर्गिक प्रदेश असे म्हणतात.

**पृथ्वीवरील भूप्रदेश प्रामुख्याने पुढील नैसर्गिक प्रदेशांत विभागला जातो.**

१. टुंड्रा प्रदेश
२. तैगा प्रदेश
३. गवताळ प्रदेश (स्टेप्स व प्रेअरी)
४. उष्ण वाळवंटी प्रदेश
५. गवताळ प्रदेश (सुदान)
६. विषुववृत्तीय प्रदेश

- वरील नैसर्गिक प्रदेश विषुववृत्तापासून ध्रुवापर्यंत विशिष्ट अक्षवृत्तीय भागांत आढळून येतात.
- तापमान व पाण्याची उपलब्धता या घटकांवरून या नैसर्गिक प्रदेशांचे स्थान आणि विस्तार निश्चित होतो.
- अक्षवृत्तीय स्थान, प्रदेश, हवामान, नैसर्गिक वनस्पती, प्राणिजीवन आणि मानवीजीवन या मुद्द्यांनुसार वरील प्रदेशांची माहिती पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक ३२ आणि ३३ वर तक्त्याच्या स्वरूपात दिली आहे.

**या प्रदेशांशिवाय स्थानिक परिस्थितीमुळे काही प्रदेश वेगळे दिसून येतात. यांमध्ये मोसमी प्रदेश, भूमध्य सागरी प्रदेश आणि पश्चिम युरोपीय प्रदेशांचा प्रामुख्याने समावेश होतो.**

१. पश्चिम युरोपीय व मोसमी प्रदेश विशिष्ट वाऱ्यांच्या प्रभावामुळे लक्षात येतात.
२. भूमध्य सागरी प्रदेश हा तेथील पावसाच्या विशिष्ट कालावधीमुळे लक्षात येतो. हिवाळ्यातील पाऊस हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे.
३. विषुववृत्तापासून ध्रुवीय प्रदेशाकडे जाताना जैवविविधतेतील बदल उत्तरोत्तर कमी होत जातात, त्यामुळे साधनसंपत्तीची उपलब्धताही घटत जाते.
४. मर्यादित साधनसंपत्तीमुळे मानवाच्या व्यवसायांवर परिणाम होतो.

## नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार प्रदेशनिहाय व्यवसायांचे स्वरूप

**मान्सून प्रदेश:** शेती व शेतीपूरक व्यवसाय.
**विषुववृत्तीय प्रदेश:** वनोत्पादनावर आधारित लाकूड कटाई, डिंक, मध, रबर, लाख गोळा करणे.
**तैगा प्रदेश:** मऊ लाकूड आढळते, त्यामुळे लाकूडतोड हा मुख्य व्यवसाय.
**टुंड्रा प्रदेश:** शिकार व मासेमारी.
**गवताळ प्रदेश:** विस्तीर्ण शेती.

१. वेगवेगळ्या नैसर्गिक प्रदेशांत पर्यावरण आणि उपलब्ध साधनसंपत्तीमध्ये खूप फरक असतो.
२. त्या त्या प्रदेशांतील विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर साधनसंपत्तीचा वापर अवलंबून असतो.
३. मानवाबरोबरच पृथ्वावरील सर्वच सजीवांचे जीवन नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असते.

SAMPLE CONTENT

४. पृथ्वीवरील एकूण वाळवंटांपैकी सुमारे २५ टक्के वाळवंटे वाळूची असतात.
५. उरलेली वाळवंटे माळरानांसारखी कातळांनी, छोट्या छोट्या दगडांनी किंवा गोट्यांनी व्यापलेली असतात.
६. काही वाळवंटांमध्ये उंच डोंगर किंवा चित्रविचित्र आकारांच्या कातळांचे काही सुळके असतात. उदा. लडाख (भारत) आणि ॲरिझोना (अमेरिका) येथील वाळवंटे.
७. **ड्यून्स (Dunes)** - वाळवंटावरून वाहणाऱ्या वेगवान वाऱ्यांनी तेथील वाळू उचलून तयार केलेल्या टेकड्या.
८. काही ड्यून्स २०० मीटर पर्यंतच्या उंचीचेही असतात.
९. ड्यून्स वाऱ्यामुळे हळूहळू सरकत राहतात. काही वेळा त्यांखाली गावेही गाडली जातात.

## संकलित मूल्यमापन

### रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. टुंड्रा प्रदेशातील हवामान अतिशय ............. असते.
२. विषुववृत्तापासून २०° ते ३०° अक्षवृत्तांच्या दरम्यान ............. प्रदेश आहे.
३. गवताळ प्रदेश (सुदान) विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस ............. ते ............. अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे.
४. ............. प्रदेशातील लोक झाडांवर घरे बांधतात.
५. विषुववृत्तीय प्रदेशात ............. ही विषारी माशी आढळते.

**उत्तर:** १. थंड २. उष्ण वाळवंटी ३. ५° ते २०° ४. विषुववृत्तीय
५. त्से - त्से

### योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. स्टेप्स व प्रेअरी प्रदेशातील लोक .............
अ. कातड्याच्या तंबूत राहतात.
ब. झाडावर घरे बांधतात.
क. मातीच्या भिंती व गवताचे छप्पर असलेल्या घरात राहतात.
ड. इग्लूमध्ये राहतात.

२. घनदाट सदाहरित वने .............
अ. तैगा प्रदेशात आढळतात. ब. सुदानच्या गवताळ प्रदेशात आढळतात.
क. विषुववृत्तीय प्रदेशात आढळतात. ड. टुंड्रा प्रदेशात आढळतात.

३. भूमध्य सागरी प्रदेशात .............
अ. उन्हाळ्यात पाऊस पडतो. ब. हिवाळ्यात पाऊस पडतो.
क. वर्षभर पाऊस पडतो. ड. क्वचितच पाऊस पडतो.

४. ग्रीक व रोमन संस्कृतींचा विकास .............
अ. मोसमी प्रदेशात झाला आहे. ब. भूमध्य सागरी प्रदेशात झाला आहे.
क. पश्चिम युरोपीय प्रदेशात झाला आहे. ड. उष्ण वाळवंटी प्रदेशात झाला आहे.

**उत्तर:** १. कातड्याच्या तंबूत राहतात. २. विषुववृत्तीय प्रदेशात आढळतात.
३. हिवाळ्यात पाऊस पडतो. ४. भूमध्य सागरी प्रदेशात झाला आहे.

SAMPLE CONTENT

## *खालील विधाने लक्षपूर्वक वाचा. चूक असल्यास विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.

**१. प्रेअरी प्रदेशाला 'जगातील गव्हाचे कोठार' असे म्हणतात.**

**उत्तर:** विधान बरोबर आहे.

**२. उष्ण वाळवंटी प्रदेशात 'उंट' हा महत्त्वाचा प्राणी आहे, कारण तो अन्नपाण्याशिवाय दीर्घकाळ राहतो, तसेच वाहतुकीसाठी उपयोगी आहे.**

**उत्तर:** विधान बरोबर आहे.

**३. वाघ, सिंहासारखे मांसभक्षक प्राणी विषुववृत्तीय प्रदेशांत जास्त आढळतात.**

**उत्तर:** वाघ, सिंहासारखे मांसभक्षक प्राणी सुदानच्या गवताळ प्रदेशात जास्त आढळतात.

**४. भूमध्य सागरी प्रदेशातील झाडांची पाने मेणचट असतात आणि झाडांची साल फार जाड असते. झाडांतील पाण्याचे बाष्पीभवन जास्त होते.**

**उत्तर:** उष्ण वाळवंटी प्रदेशातील झाडांची पाने मेणचट असतात आणि झाडांची साल फार जाड असते. झाडांतील पाण्याचे बाष्पीभवन जास्त होते.

**५. पश्चिम युरोपीय प्रदेशांतील लोक सौम्य व उबदार हवामानामुळे उत्साही नसतात.**

**उत्तर:** पश्चिम युरोपीय प्रदेशांतील लोक सौम्य व उबदार हवामानामुळे उत्साही असतात.

## योग्य जोड्या जुळवा.

**१. 'अ' गटातील गवताळ प्रदेशांची नावे (स्टेप्स व प्रेअरी) व 'ब' गटातील विभाग यांच्या जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | स्टेप्स | अ. | उत्तर अमेरिका |
| ii. | व्हेल्ड | ब. | दक्षिण अमेरिका |
| iii. | पंपास | क. | दक्षिण आफ्रिका |
| iv. | डाऊन्स | ड. | युरेशिया |
| v. | प्रेअरी | इ. | ऑस्ट्रेलिया |
| | | ई. | मध्य अमेरिका |

**उत्तर:** (i – ड), (ii – क), (iii – ब), (iv – इ), (v – अ)

**२. 'अ' गटातील वाळवंटे व 'ब' गटातील खंड यांच्या जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | थर | अ. | उत्तर आफ्रिका |
| ii. | कलहारी | ब. | आशिया |
| iii. | अटाकामा | क. | उत्तर अमेरिका |
| iv. | सहारा | ड. | दक्षिण अमेरिका |
| v. | कोलोरॅडो | इ. | दक्षिण आफ्रिका |
| | | ई. | ऑस्ट्रेलिया |

**उत्तर:** (i – ब), (ii – इ), (iii – ड), (iv – अ), (v – क)

SAMPLE CONTENT

## एका वाक्यात उत्तरे लिहा.

**१. पृथ्वीवर वेगवेगळ्या भागांत भूस्वरूपे, हवामान, मृदा यांच्यातील भिन्नता कशावर अवलंबून आहे?**

**उत्तर:** पृथ्वीवर वेगवेगळ्या भागांत भूस्वरूपे, हवामान, मृदा यांच्यातील भिन्नता त्या त्या भागांत उपलब्ध सूर्यप्रकाश आणि पाणी यांच्यावर अवलंबून आहे.

**२. पृथ्वीवरील वेगवेगळ्या खंडांत विशिष्ट अक्षवृत्तांच्या दरम्यान कोणत्या बाबींत साधर्म्य आढळते?**

**उत्तर:** पृथ्वीवरील वेगवेगळ्या खंडांत विशिष्ट अक्षवृत्तांच्या दरम्यान हवामान, वनस्पती व प्राणिजीवन यांत साधर्म्य आढळते.

***३. तैगा प्रदेशाचा विस्तार कोणत्या अक्षवृत्तांदरम्यान आहे?**

**उत्तर:** तैगा प्रदेशाचा विस्तार ५५° उत्तर ते ६५° उत्तर अक्षवृत्तांदरम्यान आहे.

**४. क्रॉल म्हणजे काय?**

**उत्तर:** सुदानच्या गवताळ प्रदेशातील झुलू, हौसा, मसाई इत्यादी जमातीचे लोक ठेंगण्या व गोलाकार झोपड्यांमध्ये राहतात, या झोपड्यांनाच 'क्रॉल' असे म्हणतात.

**५. कोणकोणत्या प्रदेशांत वर्षभर पाऊस पडतो?**

**उत्तर:** विषुववृत्तीय प्रदेशात आणि पश्चिम युरोपीय प्रदेशात वर्षभर पाऊस पडतो.

**६. स्थानिक परिस्थितीमुळे वेगळे दिसून येणारे प्रमुख प्रदेश कोणते?**

उत्तर: प्रामुख्याने मोसमी प्रदेश, भूमध्य सागरी प्रदेश आणि पश्चिम युरोपीय प्रदेश हे प्रदेश स्थानिक परिस्थितीमुळे वेगळे दिसून येतात.

**७. कोणत्या प्रदेशात पश्चिमी वाऱ्यांच्या आवर्तापासून पाऊस पडतो?**

**उत्तर:** पश्चिम युरोपीय प्रदेशात पश्चिमी वाऱ्यांच्या आवर्तापासून पाऊस पडतो.

**८. 'ड्यून्स' (Dunes) म्हणजे काय?**

**उत्तर:** वाळवंटावरून वाहणारे वेगवान वारे तेथील वाळू उचलून त्यांच्या टेकड्या तयार करतात, त्यांनाच इंग्रजीत 'ड्यून्स' (Dunes) असे म्हणतात.

## एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

**१. उष्ण वाळवंटी प्रदेशात कशा प्रकारचे हवामान असते?**

**उत्तर:** या प्रदेशातील उन्हाळ्यातील सरासरी तापमान ३०° ते ४५° से. असून हिवाळ्यात २०° ते २५° से. एवढे असते. अतिउष्णता, अत्यल्प पाऊस आणि रात्रीच्या वेळी खूप थंडी हे येथील हवामानाचे वैशिष्ट्य आहे.

**२. सुदानच्या गवताळ प्रदेशातील घरे कशा प्रकारची असतात?**

**उत्तर:** या प्रदेशात मातीच्या भिंती व गवताचे छप्पर असलेली साधी घरे असून त्यांना खिडक्या नसतात. येथील ठेंगण्या व गोलाकार झोपड्यांना क्रॉल असे म्हणतात.

SAMPLE CONTENT

## फरक स्पष्ट करा.

**१. टुंड्रा प्रदेश आणि विषुववृत्तीय प्रदेश**

**उत्तर:**

| | टुंड्रा प्रदेश | विषुववृत्तीय प्रदेश |
|---|---|---|
| i. | हा प्रदेश ६५° ते ९०° उत्तर अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे. | हा प्रदेश विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस ५° अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे. |
| ii. | येथे सरासरी २५ ते ३०० मिमी पाऊस पडतो. हवामान अतिशय थंड असते. | येथे सरासरी २५०० ते ३००० मिमी पाऊस पडतो. हवामान अतिशय उष्ण असते. |
| iii. | वर्षातील फारच कमी काळ येथे वनस्पतींसाठी अनुकूल हवामान असते, त्यामुळे छोटी झुडपे, खुरटे गवत, फुले, शेवाळ दगडफूल अशा अल्पकाळ टिकणाऱ्या वनस्पती आढळतात. | वर्षभर पाऊस पडत असल्याने येथील तापमान वनस्पतींच्या वाढीसाठी अनुकूल आहे, त्यामुळे येथे घनदाट सदाहरित वने आढळतात. |
| iv. | अतिशय थंड हवामानामुळे येथील प्राणिजीवनात फारसे वैविध्य आढळत नाही. यामध्ये कॅरिबू, रेनडियर, ध्रुवीय अस्वल, सील व वॉलरस मासे इ. प्राणिजीवन आहे. | येथील प्राणिजीवनात खूप वैविध्य आढळते. यामध्ये दलदलीच्या प्रदेशात राहणारे, झाडांवर राहणारे प्राणी व कीटक यांचे वैविध्य आहे. |
| v. | येथील लोक कातड्याचे तंबू (ट्यूपिक) आणि बर्फाच्या घरात (इग्लू) राहतात. | येथील लोक झाडावर घरे बांधून राहतात. |

## *थोडक्यात उत्तरे लिहा.

**१. सुदान प्रदेशातील कोणतेही तीन तृणभक्षक प्राणी सांगा. त्यांच्या स्वसंरक्षणासाठी निसर्गाने कोणती व्यवस्था केली आहे?**

**उत्तर:** i. सुदान प्रदेशात झेब्रा, जिराफ आणि रानबैल हे तृणभक्षक प्राणी आढळतात.

ii. येथे उंच व दाट गवत आढळते. या नैसर्गिक स्थितीमध्ये सहज सामावून जाता यावे आणि हिंस्त्र प्राण्यांपासून जीव वाचवता यावा, म्हणून तृणभक्षक प्राण्यांच्या अंगावरील रंगीत पट्टे व ठिपके त्याचबरोबर चपळ पाय अशी व्यवस्था निसर्गाने केली आहे.

**२. मोसमी प्रदेशांखाली दिलेली वैशिष्ट्ये कोणती?**

**उत्तर:** i. मोसमी प्रदेशाचे स्थान विषुववृत्ताच्या उत्तरेला व दक्षिणेला १०° ते ३०° अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे.

ii. येथील उन्हाळ्यातील तापमान २७° से. ते ३२° से असते, तर हिवाळ्यातील तापमान १५° ते २४° से. एवढे असते.

iii. नैऋत्य मान्सून वाऱ्यांपासून ठरावीक ऋतूंत पडणारा पाऊस हे या प्रदेशाचे वेगळेपण आहे. पावसाचे वितरण असमान व अनिश्चित असते.

iv. मोसमी प्रदेशांतील वने पानझडी व निमसदाहरित प्रकारची असून वड, पिंपळ, शिसव, साग, खैर, चंदन, बांबू, बाभूळ इत्यादी वृक्ष, तसेच झुडपे व गवत आढळते.

v. वाघ, सिंह, बिबट्या, लांडगे, माकडे, रानडुकरे, मोर, कोकीळ, साप इत्यादी वन्य पशु-पक्षी व गाई-म्हशी, घोडे, शेळ्या इत्यादी पाळीव प्राणी आढळतात.

vi. या प्रदेशात लहान लहान असंख्य खेडी आहेत.

vii. येथील लोकसंख्या प्रामुख्याने प्राथमिक व्यवसायात आढळत असून शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे.

SAMPLE CONTENT

## टिपा लिहा.

**१. तैगा प्रदेश:**

**उत्तर:** i. हा प्रदेश सुमारे ५५° उत्तर ते ६५° उत्तर अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे. यामध्ये अलास्कापासून अटलांटिक महासागरापर्यंतचा भाग, तसेच युरेशियाचा भाग या भूप्रदेशाचा समावेश होतो.

ii. येथे हिवाळ्यातील तापमान ०° से. पेक्षा कमी असून उन्हाळ्यातील तापमान सुमारे १५° ते २०° से. एवढे असते.

iii. वार्षिक सरासरी ३०० ते ५०० मिमी पाऊस होते. उन्हाळ्यात पाऊस पडतो, तर हिवाळ्यात हिमवृष्टी होते.

iv. येथील वने सूचिपर्णी प्रकारची आहेत. स्प्रूस, फर, पाईन, रेडवुड इ. वृक्ष येथे आढळतात. त्यांचे लाकूड मऊ व हलके असते.

v. येथील प्राण्यांच्या अंगावर दाट व मऊ केस असतात. येथे कॅरिबू, एल्क, आर्मिन, बीव्हर, सिल्व्हर फॉक्स, मिंक अस्वले इ. प्राणी आढळतात.

vi. या प्रदेशात लोकसंख्या कमी असून शिकार आणि लाकूडतोड हे येथील प्रमुख व्यवसाय आहेत.

**२. उष्ण वाळवंटी प्रदेशातील प्राणिजीवन आणि मानवी जीवन:**

**उत्तर:** i. उष्ण वाळवंटी प्रदेशात जमिनीवर प्राण्यांची संख्या कमी आहे. साप, उंदीर, सरडे, विंचू इ. प्राणी दिवसा जमिनीखाली राहतात.

ii. उंट, घोडे, बैल, गाढव, मेंढ्या हे येथील प्रमुख प्राणी आहेत. उंट अन्नपाण्याशिवाय अनेक दिवस राहू शकतो.

iii. येथील लोक अनेक गरजा जनावरांपासून पूर्ण करतात. वाहतुकीसाठी प्रामुख्याने उंटाचा वापर केला जातो. मरूद्याने व नद्यांची खोरी येथे शेती केली जाते.

iv. सहारा आणि कलहारी या वाळवंटात अनुक्रमे बदाऊन आणि बुशमेन हे लोक आढळतात, तर ऑस्ट्रेलियातील वाळवंटात ॲबॉरिजिन लोक राहतात.

## *भौगोलिक कारणे द्या.

**१. टुंड्रा प्रदेशात वनस्पती जीवन अल्पकाळ टिकणारे असते.**

**उत्तर:** i. टुंड्रा प्रदेशाचा विस्तार सुमारे ६५° ते ९०° अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे. येथे अतिशय थंड हवामान असते. हिवाळ्यातील तापमान सुमारे-२०° ते -३०° से. एवढे असते. वर्षातील बहुतांश काळ हिवाळा असतो आणि येथील जमीन बर्फाच्छादित असते.

ii. या प्रदेशातील उन्हाळ्यातील सरासरी तापमान १०° से. एवढे असते. उन्हाळ्याचा कालावधी फारच कमी असतो. हाच कालावधी छोटी झुडपे, खुरटे गवत, फुले, शेवाळ, दगडफूल इ. वनस्पतींच्या वाढीस अनुकूल असतो.

iii. हिवाळ्यात जमिनीवरील बर्फाच्छादनामुळे वनस्पती नष्ट होतात.

परिणामी, टुंड्रा प्रदेशात वनस्पती जीवन अल्पकाळ टिकणारे असते.

**२. विषुववृत्तीय वनातील वृक्ष उंच वाढतात.**

**उत्तर:** i. विषुववृत्तीय प्रदेशात जास्त उष्णता व वर्षभर पाऊस पडतो. येथील हवामान वृक्षांच्या वाढीसाठी अनुकूल असल्याने वृक्षांची वाढ झपाट्याने होते.

ii. वनस्पतींना अन्न तयार करण्यासाठी सूर्यप्रकाश अत्यंत आवश्यक असतो. घनदाट सदाहरित वनांमुळे या भागात सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे दाटीवाटीने वाढणाऱ्या वृक्षांमध्ये सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी स्पर्धा निर्माण होते.

परिणामी, विषुववृत्तीय वनातील वृक्ष उंच वाढतात.

**३. मोसमी प्रदेशात प्रामुख्याने शेती व्यवसाय करतात.**

**उत्तर:** i. शेती व्यवसायासाठी पाण्याची उपलब्धता ही मूलभूत गरज आहे.

ii. मोसमी प्रदेशात वर्षातील ठरावीक कालावधीत पाऊस पडतो, त्यामुळे पावसाच्या आगमनानुसार शेतीचे नियोजन करणे शक्य होते.


परिणामी, मोसमी प्रदेशात प्रामुख्याने शेती व्यवसाय करतात.

SAMPLE CONTENT

***जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील नैसर्गिक प्रदेश दाखवा. सूची तयार करा.**

१. कोलोरॅडो वाळवंट  २. डाऊन्स गवताळ प्रदेश  ३. भूमध्य सागरी हवामान
४. ब्रिटिश कोलंबिया  ५. ग्रीनलँडचा लोकवस्ती असलेला भाग

**उत्तर:**




## आकारिक मूल्यमापन

**सांगा पाहू !** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३०)

**पाठ्यपुस्तकात दिलेल्या चित्रांजवळील चौकटींत सोबतच्या सूचीनुसार खुणा करा.**
(विद्यार्थ्यांनी या खुणा स्वत: करणे अपेक्षित आहे.)

**तुम्ही केलेल्या निवडीच्या व खालील प्रश्नांच्या आधारे वर्गात चर्चा करा.**

१. **चित्रांत दाखवलेली सर्व घरे आपल्या परिसरात का आढळत नाहीत?**

**उत्तर:** एखाद्या प्रदेशातील हवामानानुसार तेथील घरांची रचना केली जाते, त्यामुळे चित्रांत दाखवलेली सर्व घरे आपल्या परिसरात आढळत नाहीत.

२. **अशा प्रकारची घरे असलेले प्रदेश कोणते?**

**उत्तर:** चित्रातील घरे डावीकडून उजवीकडे अनुक्रमे जास्त पावसाचा प्रदेश, महानगर, टुंड्रा प्रदेश, भारतीय ग्रामीण भागातील शेती-शिवाराजवळील भाग, बर्फाच्छादित प्रदेश, भारतीय वाळवंटी प्रदेश, सुदानी गवताळ प्रदेश व भारतीय खेड्यातील आहेत.

३. **बर्फाच्या घरात राहणे तुम्हांला आवडेल का? मग ही घरे आपण का बांधत नाही?**

**उत्तर:** बर्फाच्या घरात राहणे मला आवडेल; पण महाराष्ट्रातील उष्ण वातावरणात ही घरे बांधणे शक्य नाही, कारण ही घरे येथे टिकूच शकत नाहीत, म्हणून आपण ही घरे बांधत नाही.

**४. लोकांच्या पोशाखात कशामुळे फरक पडला असावा?**

**उत्तर:** लोकांचा पोशाख त्या त्या ठिकाणच्या हवामानानुसार ठरत असतो, त्यामुळे हवामान या मुख्य घटकामुळे लोकांच्या पोशाखात फरक पडला असावा.

**५. अन्न म्हणून खबूस, किडे, मुंग्या यांचा वापर कोठे होत असेल?**

**उत्तर:** खबूस (Khubz) हा अन्नपदार्थ मध्य-पूर्व आशियामध्ये मानवाच्या आहारातील आहे, तर किडे व मुंग्यांचा अन्न म्हणून वापर मागासलेल्या प्रदेशांमध्ये होत असावा.

**६. आपल्याकडील प्राणिसंग्रहालयांमध्ये ध्रुवीय अस्वल, पेंग्विन हे प्राणी ठेवता येतील का?**

**उत्तर:** ध्रुवीय अस्वल, पेंग्विन हे प्राणी थंड प्रदेशात आढळतात, त्यामुळे त्यांना अनुकूल असे हवामान कृत्रिमरीत्या तयार केल्यास हे प्राणी आपल्याकडील प्राणिसंग्रहालयांमध्ये ठेवता येतील. मुंबई (भायखळा) येथील वीर जिजामाता भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात (राणीची बाग) कृत्रिमरीत्या थंड वातावरणाचे कक्ष तयार करून त्यांमध्ये पेंग्विन ठेवण्यात आले आहेत.

**७. चित्रांत दाखवलेल्या सर्व वनस्पती आपल्या परिसरात आढळतात का? नसल्यास त्या कोठे आढळत असाव्यात?**

**उत्तर:** चित्रांत दाखवलेल्या वनस्पतींपैकी काही वनस्पती आपल्या परिसरात आढळत नाहीत. चित्र क्र.२ व ९ मधील वनस्पती जास्त पावसाच्या प्रदेशात, चित्र ३ मधील वनस्पती वाळवंटी प्रदेशात, चित्र ५ मधील वनस्पती शुष्क किंवा अत्यल्प पावसाच्या प्रदेशात, चित्र ६ मधील समशीतोष्ण कटिबंधीय प्रदेशातील, तर शेवटच्या चित्रातील वनस्पती पर्वतीय प्रदेशातील असाव्यात.

**चला खेळूया?** (पाठ्यपुस्तक पुस्तक पृष्ठ क्र.३३)

**उत्तर:** (विद्यार्थ्यांनी हा उपक्रम स्वत: करून पाहणे अपेक्षित आहे.)

**नकाशाशीं मैत्री** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३५ आणि ३६)

**आकृती ६.१ चा वापर करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**१. भारतात कोणकोणते नैसर्गिक प्रदेश आढळतात?**

**उत्तर:** भारतात मोसमी, पर्वतीय प्रदेश व उष्ण वाळवंटी प्रदेश हे नैसर्गिक प्रदेश आढळतात.

**२. उष्ण वाळवंटी प्रदेशाचा जास्त भूभाग कोणत्या खंडात येतो?**

**उत्तर:** उष्ण वाळवंटी प्रदेशाचा जास्त भूभाग आफ्रिका खंडात येतो.

**३. नैसर्गिक प्रदेशांत सर्वांत जास्त विविधता कोणत्या खंडात आहे?**

**उत्तर:** नैसर्गिक प्रदेशांत सर्वांत जास्त विविधता आशिया खंडात आहे.

**४. उत्तर गोलार्धाच्या तुलनेत दक्षिण गोलार्धात नैसर्गिक प्रदेश कमी असल्याचे कारण कोणते असेल?**

**उत्तर:** पृथ्वीवरील जमीन व पाणी यांच्या वितरणाचा विचार करता, उत्तर गोलार्धाच्या तुलनेत दक्षिण गोलार्धात जलभागाचे प्रमाण जास्त आहे. परिणामी, दक्षिण गोलार्धात उत्तर गोलार्धाच्या तुलनेत नैसर्गिक प्रदेश कमी आहे.

**५. जगाच्या संदर्भात कोणत्या नैसर्गिक प्रदेशाचे क्षेत्र जास्त आहे?**

**उत्तर:** जगाच्या संदर्भात तैगा प्रदेशाचे क्षेत्र सर्वांत जास्त असून पृथ्वीवरील भूपृष्ठाचे सुमारे १७% क्षेत्र व्यापलेले आहे.

**६. अंटार्क्टिका खंडासारखी परिस्थिती आणखी कोठे आढळते?**

**उत्तर:** अंटार्क्टिका खंडासारखी परिस्थिती उत्तर ध्रुवावरील आर्क्टिक महासागरातील ग्रीनलँडचा उत्तरेकडील भाग व इतर बेटांवर आढळते.

**७. मूळ रेखावृत्त ज्या भूभागावरून जाते, त्या भूभागात कोणकोणते नैसर्गिक प्रदेश आढळतात ?**

**उत्तर:** मूळ रेखावृत्त ज्या भूभागावरून जाते, त्या भूभागात पश्चिम युरोपीय प्रदेश, पर्वतीय प्रदेश, भूमध्य सागरी हवामानाचा प्रदेश, उष्ण वाळवंटी प्रदेश, उष्ण कटिबंधीय गवताळ प्रदेश हे नैसर्गिक प्रदेश आढळतात.

SAMPLE CONTENT

**पाठातील प्रश्न** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३६)

**१. अल्पकालीन वनस्पती जीवन असलेला प्रदेश कोणता?**

**उत्तर:** टुंड्रा प्रदेश हा अल्पकालीन वनस्पती जीवन असलेला प्रदेश होय.

**२. क्रॉल असणारा नैसर्गिक प्रदेश कोणता आहे ?**

**उत्तर:** सुदान गवताळ प्रदेशात क्रॉल आहेत.

**३. हिवाळी पावसाचा प्रदेश कोणता?**

**उत्तर:** भूमध्य सागरी प्रदेश हा हिवाळी पावसाचा प्रदेश आहे.

**४. गोरिला, चिंपांझी कोणत्या नैसर्गिक प्रदेशात आढळतात?**

**उत्तर:** विषुववृत्तीय प्रदेशात गोरिला, चिंपाझी आढळतात.

**५. कोणत्या नैसर्गिक प्रदेशातील अरण्यांमध्ये जमिनीलगतचा भाग वनस्पतीहीन असतो?**

**उत्तर:** विषुववृत्तीय प्रदेशात घनदाट सदाहरित वनांमुळे सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी येथील वनस्पतींमध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्या उंच वाढतात. तसेच सततच्या पावसामुळे तेथील जमिनीवर दलदल निर्माण झालेली आहे. अशा प्रकारे जमिनीजवळ सूर्यप्रकाश न पोहोचल्यामुळे व दलदलींमुळे जमिनीलगतचा भाग वनस्पतीहीन असतो.

**६. दुग्धव्यवसायास पूरक प्रदेश कोणते?**

**उत्तर:** पश्चिम युरोपीय प्रदेश हा दुग्धव्यवसायासाठी पूरक प्रदेश आहे.

**७. फलोत्पादनास अनुकूल नैसर्गिक प्रदेश कोणता?**

**उत्तर:** भूमध्य सागरी हवामानाचा प्रदेश फलोत्पादनासाठी अनुकूल आहे.

**जरा विचार करा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३६)

**१. वाघ, सिंहासारखे प्राणी विषुववृत्तीय वनांच्या प्रदेशात का आढळत नाहीत?**

**उत्तर:**
i. विषुववृत्तीय प्रदेशात वर्षभर पाऊस पडत असल्यामुळे तेथील जमीन दलदलयुक्त आहे.
ii. घनदाट सदाहरित वनांमुळे सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचू शकत नाही, त्यामुळे सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी येथील वनस्पतींमध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्या उंच वाढतात.
iii. परिणामी, येथील प्राणिजीवनही प्रामुख्याने घनदाट वृक्ष आणि दलदलयुक्त जमीन यांवर आधारित आहे. घनदाट वृक्षांवर गोरिला, चिंपांझी हे प्राणी आणि दलदलीच्या प्रदेशात सुसर, पाणघोडा, ॲनाकोंडा हे प्राणी राहतात.
iv. हे वातावरण वाघ, सिंहांसारख्या प्राण्यांसाठी अनुकूल नाही. त्याचबरोबर वाघ, सिंहांचे मुख्य भक्ष्य असणारे तृणभक्षी प्राणीदेखील येथे आढळत नाहीत, त्यामुळे वाघ, सिंहांसारखे प्राणी विषुववृत्तीय वनांच्या प्रदेशात आढळत नाहीत.

**२. उष्ण वाळवंटी प्रदेश बहुधा खंडाच्या पश्चिम भागांत आढळतात.**

**उत्तर:**
i. उष्ण वाळवंटी प्रदेश विषुववृत्तापासून २०° ते ३० ° अक्षवृत्तांच्या दरम्यान आढळतात.
ii. मध्य अक्षवृत्तीय जास्त दाबाचे पट्टे हे विषुववृत्तापासून २५° ते ३५° अक्षवृत्तांदरम्यान असून उत्तरायणात व दक्षिणायनात ५° ते ७° उत्तरेकडे व दक्षिणेकडे आंदोलित होतात.

SAMPLE CONTENT

iii. या पट्ट्यांकडून विषुववृत्तीय कमी दाबाच्या पट्ट्यांकडे पूर्वीय वारे वाहतात. हे पूर्वीय वारे पूर्वेकडून खंडावर प्रवेश करतात.

iv. त्यामुळेच, खंडाच्या पश्चिमेकडे वारे कोरडे होऊन पोहोचतात. परिणामी, पश्चिमेकडे पावसाचे प्रमाण कमी होते. यामुळेच उष्ण वाळवंटी प्रदेश बहुधा खंडाच्या पश्चिम भागात आढळतात.

**३. उष्ण वाळवंटी प्रदेशात पशुपालन करतात.**

**उत्तर:** i. उष्ण वाळवंटी प्रदेशाचे हवामान, जमीन व वनस्पती जीवन मानवी जीवनाच्या गरजा भागवण्याच्या दृष्टीने अनुकूल नाही, त्यामुळे बहुतांशी वाळवंटी प्रदेशातील मानवी जीवन भटक्या स्वरूपाचे आहे.

ii. जमीन व पाणी यांच्या प्रतिकूलतेमुळे शेती व्यवसाय फारच कमी प्रमाणात असते.

iii. आपल्या उदरनिर्वाहासाठी ते प्राण्यांवर अवलंबून असतात व या जनावरांपासूनच आपल्या गरजा पूर्ण करतात. उंट, घोडा, गाय-बैल, गाढव यांसारखे प्राणी पाळतात.

iv. येथील मानव आपल्या मूलभूत गरजांबरोबरच वाहतुकीसाठीदेखील प्राण्यांचा उपयोग करतो, यामुळेच वाळवंटी प्रदेशात पशुपालन व्यवसाय करतात.

**४. वाळवंटी प्रदेशातील लोकांचे जीवन भटक्या स्वरूपाचे असते.**

**उत्तर:** i. या प्रदेशात हवामान अत्यंत उष्ण असते. पाऊस अत्यल्प प्रमाणात पडतो. मैलोन्‌मैल वाळू पसरलेली असते.

ii. येथील माणसे उदरनिर्वाहासाठी पशुपालनावर अवलंबून आहेत. संपूर्ण वाळवंटी प्रदेशात विखुरलेल्या स्वरूपात मरूद्याने आढळतात. या ठिकाणी पाण्याची उपलब्धता असते. पाणी आणि अन्न यांच्या शोधार्थ या मरूद्यानांच्या शोधासाठी येथील लोक भटकंती करत असतात.

iii. त्याचबरोबर वाळवंटात वेगाने वाहणारे वारे तेथील वाळू उचलून टेकड्या (ड्यून्स) तयार करतात. या टेकड्या वाऱ्याने सरकत राहतात. या प्रचंड आकाराच्या टेकड्यांखाली गावेही गाडली जातात, त्यामुळे या आपत्तीपासून वाचण्यासाठी देखील येथील लोक भटक्या स्वरूपाचे जीवन जगतात.

**५. गवताळ प्रदेशात मांसभक्षक प्राणी आढळतात.**

**उत्तर:** i. या प्रदेशात तृणभक्षक प्राण्यांसाठी मोठ्या प्रमाणावर खाद्य उपलब्ध आहे, त्यामुळे येथे जिराफ, गेंडा, झेब्रा, रानबैल इ. प्राणी विपुल प्रमाणात आढळतात.

ii. हे तृणभक्षक प्राणी हे मांसभक्षक प्राण्यांचे मुख्य अन्न आहे, त्यामुळे या भागात मांसभक्षक प्राणी आढळतात.

**उपक्रम**

***१. आंतरजालाचा वापर करून या प्रकरणातील माहिती पडताळून पाहा. विविध नैसर्गिक प्रदेशांतील वनस्पती, प्राणी व लोकजीवन यांची चित्रे जमा करा. जगाच्या नकाशावर ती चिकटवून कोलाज तयार करा.**

**उत्तर:** वरील उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करून पहावा.

***२. आतापर्यंत आपण अनेक भौगोलिक बाबी अभ्यासल्या आहेत. उदा. अक्षांश, रेखांश, वृत्तजाळी, एखाद्या प्रदेशाचे हवामान, प्राकृतिक रचना, वनस्पती व प्राणिजीवनातील विविधता इत्यादी. आता आपण यासंदर्भाने एक उपक्रम करूया. आंतरजालाचा, तसेच इतर स्रोतांचा वापर करून कोणत्याही दोन नैसर्गिक प्रदेशातून प्रत्येकी एका देशाची माहिती, छायाचित्रे इत्यादी मिळवा. तसेच खालील मुद्द्यांचा वापर करून या देशांसाठी कोलाज तयार करा. त्यांचे वर्गात प्रदर्शन भरवा. आपल्या कोलाजच्या साहाय्याने सादरीकरण करा.**

[टीप: या ठिकाणी मोसमी प्रदेशातील भारत देशाविषयी माहिती दिली आहे. अशाच प्रकारे दुसऱ्या नैसर्गिक प्रदेशाविषयक माहिती मिळवा.]

SAMPLE CONTENT

उत्तर:

**देशाचे नाव :** भारत (मोसमी प्रदेश)

**स्थान-विस्तार :** स्थान-उत्तर व पूर्व गोलार्धात, आशिया खंडाच्या दक्षिण भागात. भारताच्या मध्यभागातून कर्कवृत्त जाते. अक्षवृत्तीय विस्तार-८°४'२८" उत्तर ते ३७°६'५३" उत्तर, रेखावृत्तीय विस्तार-६८°७'३३" पूर्व ते ९७°२४'४७" पूर्व. एकूण क्षेत्रफळ-३२, ८७, २६३ चौकिमी, भू-सीमा-१५,२०० किमी, सागरी किनारा-७,५१७ किमी.

**हवामान :** भारताला प्रामुख्याने नैऋत्य मौसमी वाऱ्यांपासून पाऊस मिळतो. भारताचा विस्तार पाहता स्थानिक परिस्थितीनुसार हवामानात विविधता आढळते. किनारी भागात उष्ण व दमट हवामान, राजस्थान सारख्या भागात उष्ण, तर पठारी भागात उष्ण व कोरडे आहे. ईशान्य भारतातील आसाम, मेघालय मध्ये अतिपर्जन्याचा भाग आहे आणि पर्वतीय भागात उत्तरेला थंड, तर हिमालयाच्या पायथ्याकडील प्रदेश उबदार आहेत.

**वनस्पती :** हवामानातील वैविध्यामुळे वनस्पती जीवनावर परिणाम झाला असल्याने भारतात वनस्पतींमध्येही विविधता आढळते. त्यामुळे भारतात सदाहरित, पानझडी, शुष्क व काटेरी प्रकारच्या वनस्पती, पर्वतीय सूचिपर्णी, तर पश्चिम बंगालच्या किनारी भागात सुंदरबन येथे मँग्रुव्ह सारखी वनस्पती आढळते.

**प्राणी :** पाळीव प्राण्यांबरोबर भारतात जंगलांच्या भागात हिंस्त्रप्राणी आढळतात. जसे गीर येथे सिंह, बंगालमध्ये पांढरा पट्टेरी वाघ, आसाममध्ये एकशिंगी गेंडा याव्यतिरिक्त हरिण, अस्वल इ. प्राणी आढळतात.

**मानवी जीवन :** हवामान व जमिनीचा प्रकार यांनुसार मानवी जीवनात विविधता आहे. वनांच्या भागात काही आदिवासी जमाती, ग्रामीण भागांतही प्रदेशानुसार विविध प्रकारचे लोकजीवन आढळते, तर शहरांमध्ये सर्व जाती धर्मांचे लोक राहतात.

**पोशाख :** प्रदेशांच्या हवामानानुसार व संस्कृतीच्या प्रभावामुळे लोकांच्या पोशाखात विविधता दिसून येते.

**मानवी व्यवसाय :** भारतात प्रामुख्याने शेती हा व्यवसाय केला जातो, याव्यतिरिक्त पशुपालन, वनोद्योग इ. प्राथमिक व्यवसाय, तर साधन-संपत्तीवर आधारित द्वितीय व्यवसाय आणि तृतीय व चतुर्थ श्रेणीचे व्यवसाय शहरी, महानगरांसारख्या भागात आढळतात.

**देशाची वैशिष्ट्ये :**

i. प्राकृतिक-उष्ण कटिबंधीय मोसमी हवामानाचा प्रदेश. भारतीय द्वीपकल्पाच्या तीनही सीमा सागरी असून उत्तरेकडील सीमेवर हिमालय पर्वतरांगा आहेत.

ii. नदी प्रणाली – भारतातील गंगा नदी सर्वांत लांब, तर बह्मपुत्रा ही मोठी नदी आहे. या नदीमध्ये अनेक बेटे आहेत, तर दक्षिण भारतात गोदावरी नदीला भारताची दक्षिण गंगा संबोधले जाते.

iii. हवामान – नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे प्रामुख्याने पाऊस पडतो; परंतु पावसाचे वितरण असमान व अनिश्चित असते.

iv. वनस्पती – भारतात पश्चिम घाट या भागात नैसर्गिक विविधता आढळते व ती जपण्याचा जागतिक स्तरावरही प्रयत्न केला आहे.

v. प्राणी – पांढरा वाघ, एकशिंगी गेंडा, शेकरू इ. प्राणी वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

vi. सांस्कृतिक – भारतातील सांस्कृतिक विविधता लक्षात घेता, तसेच येथील ऐतिहासिक वारसा लक्षात घेता, ताजमहाल ही वास्तू जागतिक स्तरावर वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. तसेच, पर्यटनाच्या दृष्टीने विविध सांस्कृतिक ठिकाणे आहेत. जसे जयपूर, अलाहाबाद, रामेश्वरम, मदुराई इ.

## पाठाची उजळणी

**प्र.१. रिकाम्या जागा भरा.**

i. स्टेप्स व प्रेअरी गवताळ प्रदेशातील लोक ............. शेती करतात.

ii. ............. प्रदेशात द्वितीय व तृतीय श्रेणीतील व्यवसाय वाढत आहेत?

iii. सुसर, पाणघोडा, ॲनाकोंडा हे प्राणी ............. प्रदेशात आढळतात.

iv. ............. प्रदेशात बहुतेक पाऊस उन्हाळ्यात पडतो.

**प्र.२. 'अ' गटातील आदिवासी जमाती व 'ब' गटातील वास्तव्याचे प्रदेश यांच्या जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | किरगीज | अ. | विषुववृत्तीय प्रदेश |
| ii. | बदाऊन | ब. | सुदानचा गवताळ प्रदेश |
| iii. | एस्किमो | क. | उष्ण वाळवंटी प्रदेश |
| iv. | झुलू | ड. | स्टेप्स व प्रेअरीचा गवताळ प्रदेश |
| v. | पिग्मी | इ. | टुंड्रा प्रदेश |
| | | फ. | भूमध्य हवामानाचा प्रदेश |

**प्र.३. कारणे लिहा.**

i. पश्चिम युरोपीय प्रदेशातील लोक उत्साही व दर्यावर्दी आहेत.

ii. तैगा प्रदेशात सूचिपर्णी वने आढळतात.

**प्र.४. टीप लिहा.**

i. गवताळ प्रदेश (स्टेप्स व प्रेअरी)

**उत्तर:**

१. i. गव्हाची ii. पश्चिम युरोपीय iii. विषुववृत्तीय iv. स्टेप्स व प्रेअरी गवताळ

२. (i – ड), (ii – क), (iii – इ), (iv – ब), (v – अ)

३. i. अ. हे प्रदेश खंडांच्या पश्चिम भागात ४५° ते ६५° उत्तर व दक्षिण अक्षवृत्तांच्या दरम्यान आहेत. यांमध्ये नॉर्वे, डेन्मार्क, आयर्लंड, ब्रिटिश कोलंबिया, दक्षिण चिली, न्यूझीलंड इत्यादी देश आहेत.

ब. या प्रदेशाचे स्थान मुख्यतः समुद्रकिनाऱ्यांजवळ आहे. समुद्र सानिध्य, सौम्य हवामान आणि द्वितीय व तृतीय व्यवसायाच्या वाढीमुळे मिळालेली आर्थिक संपन्नता या कारणांमुळे येथील लोक उत्साही आहेत, तसेच समुद्रकिनाऱ्यांजवळ असल्यामुळे मुख्यतः दर्यावर्दी आहेत.

ii. अ. हा प्रदेश सुमारे ५५° अंश ते ६५ ° उत्तर अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे.

ब. येथे हिवाळ्यातील तापमान ०° से. पेक्षा कमी असून उन्हाळ्यातील तापमान सुमारे १५° ते २०° से एवढे असते. वार्षिक सरासरी ३०० ते ५०० मिमी पाऊस होतो. उन्हाळ्यात पाऊस पडतो, तर हिवाळ्यात हिमवृष्टी होते.

क. पावसाचे पाणी, तसेच बर्फ पानांवर साचू नये, म्हणून येथील वनांमध्ये झाडांची पाने अरुंद व टोकदार असून फांद्या जमिनीकडे झुकलेल्या असतात. या वनांमधील झाडांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे ही वने सूचिपर्णी वने म्हणून ओळखली जातात. अशाप्रकारे, हवामानाचा वनस्पतिजीवनावर परिणाम होऊन तैगा प्रदेशात सूचिपर्णी वने आढळतात.

४. i. अ. या प्रदेशाचे स्थान ३०° ते ५५° उत्तर व दक्षिण अक्षवृत्तांच्या दरम्यान खंडाच्या आतील भागात आहे. युरेशियामधील स्टेप्स, दक्षिण आफ्रिकेतील व्हेल्ड, दक्षिण अमेरिकेतील पंपास, उत्तर अमेरिकेतील प्रेअरी आणि ऑस्ट्रेलियातील डाऊन्स हे गवताळ प्रदेश या विभागात मोडतात.

ब. येथील उन्हाळ्यातील तापमान २७° से., तर हिवाळ्यातील तापमान ०° पेक्षा कमी असते. वार्षिक सरासरी पाऊस ४०० ते ६०० मिमी असून बहुतेक पाऊस उन्हाळ्यात पडतो.

क. गवताची विस्तीर्ण कुरणे हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. गवत कमी उंच व झुपक्यांनी वाढणारे आहे. हिवाळ्यात गवत नष्ट होते.

ड. हरणे, घोडे, कुत्रे, लांडगे, रानगवे, ससे, कांगारू, डिंगो इत्यादी प्राणी येथे आढळतात. त्याचबरोबर शेळ्या, मेंढ्या, गाई, बैल, घोडे आणि गाढवे इत्यादी प्राणी येथे पाळले जातात.

इ. गुरे चारणे (पशुपालन) हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. त्याचबरोबर येथे गव्हाची शेती केली जाते.

फ. येथील लोक कातड्याच्या तंबूत राहतात. येथील किरगीज जमातीचे लोक पूर्वी भटके जीवन जगत असत. आता ते पक्क्या घरात राहतात.

SAMPLE CONTENT

# इयत्ता सातवी




## AVAILABLE SUBJECTS:

- My English Book
- हिंदी सुलभभारती
- मराठी बालभारती
- गणित
- सामान्य विज्ञान
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल

BUY NOW

## ठळक वैशिष्ट्ये:

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित
- पाठाखालील सर्व प्रश्नांचा समावेश तसेच सरावासाठी अधिक प्रश्नांचा समावेश
- विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी पाठाधारित विविध कृतींचा समावेश
- गणित, सामाजिक शास्त्रे व विज्ञानामध्ये स्वयंमूल्यमापनाकरता प्रत्येक पाठाची उजळणी समाविष्ट
- भाषा विषयांमध्ये सर्व पाठ व कवितांचे शब्दार्थ, सारांश व भावार्थ समाविष्ट

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15
mail@targetpublications.org
www.targetpublications.org